# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४/०८/२०२०

### जिल्हा : जळगाव

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०४/०८/२०२० ते ०८/०८/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| पाऊस (मिमी) | 18 | 17 | 12 | 3 | 13 |
| कमाल तापमान (अं.से.) | 31 | 31 | 32 | 32 | 32 |
| किमान तापमान (अं.से.) | 24 | 23 | 23 | 24 | 24 |
| ढग स्थिती (आकाश) | 6 | 7 | 7 | 6 | 7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 81 | 86 | 83 | 80 | 81 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 55 | 55 | 66 | 54 | 56 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 8 | 16 | 13 | 13 | 17 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 116 | 249 | 203 | 248 | 273 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्हयात दिनांक ०४, ०५, ०६ व ०८ ऑगस्ट २०२० रोजी काही ठिकाणी तर ०७ ऑगस्ट २०२० रोजी तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पडण्याऱ्या पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी तसेच पिकांना वरखते देणे.<br>• पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी/ मुरविण्यासाठी उपाय योजना करावी. |
| कापूस | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे कापूस पिकावरील रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून करावी. तसेच पेरणी झालेल्या कापूस पिकावरील हिरव्या अळीच्या नियंत्रणासाठी हेक्टरी ५ फेरोमन सापळे उभारावेत. कापूस पिकावरील लाल्या रोगाच्या नियंत्रणासाठी शिफारशी खतापेक्षा २५ % जास्त खताची मात्रा द्यावी (१२५ :६५:६५) त्यासोबत २०-३० किलोग्रॅम मॅग्नेशिअम सल्फेट प्रति हेक्टरी याप्रमाणे द्यावी. याशिवाय पिक वाढीच्या काळात २ % DAP च्या दोन फवारण्या १५ दिवसाच्या अंतराने कराव्यात. कापूस जिनिंग मिल्सच्या परिसरामध्ये शेंदरी बोंड अळीसाठी फेरोमन सापळे लावावे. तसेच जिनिंग मिलच्या आसपास किमान २ कि.मी परिसरातील शेतांमध्ये फेरोमन सापळे लावावे. |

| | | |
|---|---|---|
| सोयाबीन | पिक वाढीची अवस्था | पिकावर खोडमाशीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी. |
| तुर | पिक वाढीची अवस्था | अधिक उत्पादनासाठी पिक पेरणीनंतर ३०-४५ दिवस शेत तणविरहित ठेवावे जेणेकरून जमिनीतील ओलावा व अन्न्द्रव्यासाठी पिकांची परस्परांशी स्पर्धा होणार नाही. तसेच तुरीच्या अधिक उत्पादनासाठी लागवडीपासून ४५ दिवसांनी शेंडा खुडण्याची क्रिया करावी. |
| मुग उडीद | फुलोरा अवस्था | फुलकळी लागण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत गरजेनुसार कीड व रोग नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६% एस एल ६२५ मिली + पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्राम ५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टरी पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी. |
| मका | पिक वाढीची अवस्था | मका पिकात खोड कीड नियंत्रणासाठी फोरेट १०% दाणेदार किटकनाशक हेक्टरी १० किलो प्रमाणे मातीत मिसळावे. पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १०% पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पा ण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी. |
| टोमॅटो | फळधारणा | टोमॅटोवरील फळपोखरणा-या अळीच्या व्यवस्थापनासाठी किडलेली फळे मातीत पुरुन टाकावीत तसेच डेल्टामेथ्रीन २.८ **%** ईसी ८ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ **%** ईसी २० मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ईसी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ हवामानामुळे भाजीपाला पिकावरील फुलकि डीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८**%** एस एल ५ मिली किंवा फिप्रोनिल ५ **%** एस.सी १५ मिली १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारावे. |
| केळी | पिक वाढीची अवस्था | बागेतील जमिन स्वफच्छ. व भुसभुशित ठेवावी. त्यालकरिता बी आडवी कुळवणी करावी. दर ३ महिने अंतराने टीचणी बांधणी करावी. झाडांना मातीची भर द्यावी. केळीच्याि बुंध्याालगत अनेक पिले ये लागतात. ती वेळच्याळ वेळी धारदार कोयत्याने नियमित काढून टाकावीत. केळीची रोगग्रस्त पाने कापून बागेबाहेर नष्ट करावीत. हिरवी पाने कापू नयेत. आवश्याकता भासल्यारस झाडास आधार द्यावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांच्या गोठया भोवती पाणी साठणार नाही तसेच गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जनावरांना पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ व थंड पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : ०४.०८.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**